# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.10.2024** **वारःगुरुवार**

---

1. भारतीय नौदलाची इंडो-पॅसिफिक रीजनल डायलॉग ही वार्षिक सर्वोच्च-स्तरीय आंतरराष्ट्रीय परिषद, आजपासून नवी दिल्ली इथं आयोजित
2. शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ
3. मध्य पूर्वेतील देशांच्या दरम्यान युद्धाचा तणाव वाढल्यामुळे जागतिक विमान वाहतुकीला मोठा फटका
4. महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात आणि
5. खो -खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात

**<u>नौदल-परिषद</u>**

आंतरराष्ट्रीय परिषद, आजपासून नवी दिल्ली इथं सुरू होत आहे. या तीन दिवसीय परिषदेची संकल्पना भारत-प्रशांत क्षेत्रातील भूराजनीती आणि सुरक्षा ही आहे. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उद्या या परिषदेला संबोधित करणार आहेत. ही परिषद भारतीय नौदलाच्या भारत-प्रशांत क्षेत्रापलिकडं सर्वांगीण सागरी सुरक्षा समस्यांचं निराकरण करण्यासाठीच्या धोरणात्मक पातळीवरील आंतरराष्ट्रीय सहभागाचा मुख्य उपक्रम आहे. या परिषदेत पारंपरिक आणि नवी सागरी साधनं आताच्या भू-राजकीय नीतीवर कसा प्रभाव पाडत आहेत आणि भविष्यात ते कसे आकार घेतील यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

**<u>गांधी-शास्त्री जयंती</u>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देशभरात काल विविध ठिकाणी त्यांना आदरांजली वाहण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली अर्पण केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गांधीजयंती निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाला काल 10 वर्ष पूर्ण झाली. स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असून यासाठी प्रत्येकानं कार्यरत राहिलं पाहिजे. स्वच्छतेच्या उपक्रमांना चालना मिळावी, यासाठी स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत असून यामुळे स्वच्छता मित्रांना आत्मसन्मान मिळाला आहे, असं त्यांनी सांगितलं. कचऱ्याचं संकलन, पुर्नप्रक्रिया करणारे 5 हजार स्टार्टअप गेल्या दहा वर्षांत उभे राहिले असून आगामी दहा वर्षांत या क्षेत्रात 65 लाख नोकऱ्या उत्पन्न होतील, अशी माहितीही त्यांनी दिली.

**<u>पंतप्रधान-ई-लिलाव</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या भेटवस्तूंच्या ई-लिलावाची मुदत 31 ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. हा लिलाव सात सप्टेंबरपासून ते दोन ऑक्टोबरपर्यंत आयोजित करण्यात आला होता, मात्र यात जास्तीत जास्त लोकांना सहभागी होता यावे, या उद्देशानं याची मुदत वाढविण्यात आली आहे. या लिलावात पॅरा जवळपास सहाशे भेटवस्तू असून, यातून जमा होणारा निधी नमामि गंगे उपक्रमासाठी वापरण्यात येणार आहे.

**राष्ट्रपती-राजस्थान भेट**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून राजस्थानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात त्या उदयपूर येथील मोहनलाल सुखाडिया विद्यापीठाच्या 32 व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. उद्या, राष्ट्रपती माउंट अबू येथे प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे आयोजित जागतिक शिखर परिषदेला उपस्थित राहतील. राजस्थान सरकारने आयोजित केलेल्या आदि गौरव सन्मान सोहळ्यालाही त्या उपस्थित राहणार आहेत.

**नवरात्री**

देवी दुर्गेच्या पूजेला समर्पित नऊ दिवसांचा नवरात्र उत्सव आजपासून सुरु होत आहे. देवी दुर्गेची विविध रुपांमध्ये यादरम्यान पूजा केली जाते. पहिल्या दिवशी तिला शैलपुत्री या स्वरुपात पूजिलं जातं. गुजरातमध्ये नवरात्रीचा उत्सव मोठ्या भक्तिभावानं आणि उत्साहानं साजरा केला जातो. बनासकाठामधील अंबाजी मंदीर आणि पावागढमधील महाकाली मंदिरासह राज्यातील शक्तिपीठांना भक्तगण भेट देत आहेत. गरबो हा पारंपरिक दिवा प्रज्वलित करुन या उत्सवाची सुरुवात केल्यानंतर नऊ दिवस उपवास, घट स्थापना आणि हवन यासारख्या धार्मिक परंपरांचं पालन केलं जातं. नवरात्रीच्या अनुषंगानं रास गरबाचे कार्यक्रमही अतिशय उत्साहानं आयोजित केले जात आहेत. यंदा रास गरबावरील वेळेचं बंधन राज्य सरकारनं उठवलं आहे. मात्र विशेषतः रुग्णालयांच्या निकट डीजेचा आवाज कमी ठेवण्याच्या सूचनाही केल्या आहेत.

**विमान वाहतूक फटका**

मध्य पूर्वेतील देशांच्या दरम्यान युद्धाचा तणाव वाढल्यामुळे जागतिक विमान वाहतुकीला मोठा फटका बसत आहे. फ्लाईटरडारट्वेंटीफोर या कंपनीनं दिलेल्या आकडेवारीनुसार, जगभरातील विमान कंपन्या विमानांचे मार्ग बदलत आहेत किंवा उड्डाणं रद्द करत आहेत, तर लेबनान, इस्रायल आणि कुवेतमधील विमानतळांवर उड्डाणांना प्रचंड वेळ लागत आहे. या परिस्थितीवर उपाय म्हणून युरोपिय संघ विमान वाहतुक सुरक्षितता संस्थेनं युरोपातील सर्व विमान कंपन्यांना इराणीवरील विमान वाहतुक क्षेत्र टाळण्याचा सल्ला दिला आहे. इस्रायल आणि इराण दरम्यान सुरु असलेल्या धुमश्चक्रीच्या पार्श्वभूमीवर दिलेला हा सल्ला या महिनाअखेरपर्यंत लागू राहणार असून इराणच्या विमान वाहतुक क्षेत्रात कोणत्याही उंचीवरुन विमानं जाणार नाहीत. याच्या परिणामी दुबई विमानतळावरुन अंदाजे 85 टक्के प्रस्थानांना सध्या विलंब होत असून मध्य पूर्व टाळून उड्डाणांचे मार्ग बदलण्यासाठी विमान कंपन्यांना खूप विचार करावा लागत आहे.

**हेलेन चक्रीवादळ**

अमेरिकेतील विविध राज्यांना हेलेन चक्रीवादळाचा मोठा फटका बसला आहे. या वादळामुळं मृत्यू पावलेल्या लोकांची संख्या 183 वर गेली असून, शेकडो लोक बेपत्ता झाले आहेत. उत्तर कॅरोलिना राज्यात 90 लोकांचा मृत्यू झाला आहे. अनेक भागातील वीजपुरवठा सुरळीत झाला असला, तरीही फ्लोरिडा ते व्हर्जिनियापर्यतच्या भागातील 13 लाख लोक अंधारात आहेत. दरम्यान, राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन आज उत्तर कॅरोलिनाला भेट देणार असून, त्यांनी उत्तर कॅरोलिना भागात लोकांना अन्न, पाणी पुरवण्याच्या कामात मदत करण्यासाठी एक हजार सैनिक तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवार कमला हॅरिस आज जॉर्जियाला भेट देणार आहेत. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी काल जॉर्जियाला भेट दिली.

**गडकरी-राष्ट्रीय महामार्ग**

राष्ट्रीय महामार्गांच्या बांधकामात 80 लाख टन वर्गीकृत केलेल्या कचऱ्याचा वापर करण्यात आला असल्याचं काल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर इथं सांगितलं. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यामुळं स्वच्छता अभियानाला हातभार लागत असून, रस्ते बांधताना करण्याच्या सूचना कंत्राटदारांना देण्यात आल्या आहेत, असंही त्यांनी सांगितलं. नागपूर महानगरपालिकेच्या सांडपाणी

प्रक्रिया प्रकल्पातील सांडपाणी औष्णिक वीज निर्मिती केंद्राला पुरवलं जात असून, पेंच, कोराडी, खापरखेडा प्रकल्पातील आरक्षित पाणी आता शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी उपलब्ध असल्याचंही गडकरी यांनी यावेळी सांगितलं.

**खादी वेतनवाढ**

स्पिनर्स म्हणजे सूतकताई करणाऱ्यांच्या वेतनात 25 टक्के आणि माग विणकरांच्या वेतनात 7 टक्के वाढ कालपासून लागू करण्यात आली असल्याचं केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयानं जाहीर केलं आहे. यासंबंधीची घोषणा 17 सप्टेंबरला करण्यात आली होती. खादी उत्पादनांवर 20 टक्के आणि ग्रामोद्योग उत्पादनांवर 10 टक्के सवलत देण्यात आली असल्याचं खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी सांगितलं. ही सवलत 30 नोव्हेंबरपर्यंत लागू राहील. खादी क्षेत्रातील व्यवसाय गेल्या आर्थिक वर्षामध्ये 1 लाख 55 कोटी रुपयांवर गेल्याचं देखील कुमार यांनी नमूद केलं.

**हरियाणा निवडणूक**

हरियाणातील विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपणार आहे. इथं 90 जागांसाठी शनिवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. मतमोजणी जम्मू-काश्मीरसह 8 ऑक्टोबरला होणार आहे. दरम्यान, निवडणूक आयोगानं मतदानाच्या दिवशी म्हणजे पाच ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडे सहा वाजेपर्यंत मुद्रित माध्यमं, इलेक्ट्रॉनिक मीडिया किंवा इतर कोणत्याही माध्यमातून मतदानोत्तर कल प्रसिद्ध करण्यास बंदी घातली आहे. नियमाचं उल्लंघन करणाऱ्यांना तुरुंगवास आणि दंड होऊ शकतो.

**महिला क्रिकेट**

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात होत आहे. बांग्लादेश आणि प्रथमच खेळणारा स्कॉटलंड यांच्या उद्घाटनाचा सामना होईल. भारताचा पहिला सामना उद्या न्यूझीलंडसोबत होणार आहे. येत्या 20 तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत दहा संघ उतरले आहेत. ऑस्ट्रेलियांच्या महिलांनी या स्पर्धेत मागील तिनही वेळा विजेतेपद मिळवलं असून भारतीय संघाला अद्याप एकदाही विजेतेपद मिळालेलं नाही. मुख्य स्पर्धेपूर्वी झालेल्या सराव सामन्यांमध्ये भारतीय महिलांनी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांना पराभूत केलं.

**खो-खो विश्वचषक**

खो -खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होणार आहे. भारतीय खो- खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो- खो महासंघानं काल याबाबतची माहिती दिली. या स्पर्धेत 6 खंडातले 24 देशांतले 16 पुरुष संघ आणि तितकेच महिला संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा आठवडाभर चालेल. या स्पर्धेमुळे या खेळाला असलेल्या समृद्ध वारशाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाणार आहे. आधी मातीत खेळला जाणारा हा खेळ आता मॅटवर खेळला जातो.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार